नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/१०/२०२४ (रविवार)**

---

## दरोडा घालणा—या टोळीस ४ तासत जेरबंद केले आणि मुददेमालासह गुन्हा उघडकीस आणला मौदा पोलीस यांची कामगिरी

पो.स्टे. मौदा :— दिनांक ०९/१०/२४ रोजी फिर्यादी नामे राहुल जर्नादन सावळे ,वय ३१ वर्षे रा लपका रोड मौदा यांच्या रिपोर्ट दिली की फिर्यादी हा भारत इन्क्लुजन लिमीटेड मायक्रो फायनान्स मौदा येथे समुह मॅनेजर यापदावर काम करत असुन दिनांक ०९/१०/२०२४ रोजी गादा व नेरी तसेच सोनेगाव राजा येथील बचत गटाचे महीलाची मिटींग घेवुन तिन्ही गावातुन एकुण १,३१,८१४ /—रू वसुल करून ते पैसे सोनेगाव राजा येथुन घेवुन त्याची होंडा युनिकॉर्न मो.सा क्र ४० सी.पी.०३२७ ने मौदा येथे निघाला असता उनगाव फाटयावर दुपारी ०२:३० ते ०३:०० वाजता दरम्यान एका काळया रंगाच्या स्पेडंर मोटर सायकल वरील दोन इसमांनी तसेच पांढ—या रंगाचे ॲक्टीवा मोपेड वर ३ इसम अंदाजे वय २० ते २७ वयोगटातील असे ५ इसमांनी फिर्यादीस अडवुन त्याला गाडीवरून खाली पाडुन त्यास धक्काबुक्की करून फिर्यादीचे जवळ असलेली बॅग ज्यामध्ये नगदी १,३१,८१४/— रू आणि सॅमसंग कंपनीचा टॅब किमंत ९००० रू ,बायोमॅट्रीक किंमत ३००० रू असा एकुन १,४३,८१४/— रूपयाचा माल जबरीने हिसगावुन उनगाव दिशेने पळुन गेले. असे फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोस्टे मौदा येथे कलम ३१० (२) भा.न्या.सं अन्वये नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असल्याने मा वरीष्ठांच्या आदेशान्वये मौदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री प्रमोद घोंगे यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकास त्वरीत अज्ञात आरोपीतांचा शोध घेण्याकामी आदेशीत केले. त्यानुसार पथकांने शोध मोहीम सुरू केली तेव्हा त्यांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती मिळाली की सदर गुन्हयातील मुख्य सुत्रदार आरोपी नामे १.कुणाल उर्फ

दाना इश्वर पुडके वय १९ वर्षे रा सोनेगाव राजा ता कामठी जि नागपुर याने प्रेम नगर नागपुर येथील सदर गुन्हयातील इतर आरोपीतांना कलेक्शच्या पैशाबाबत माहीती देवुन त्यांच्यासह सदर गुन्हा केल्याची माहीती प्राप्त झाली.प्राप्त माहीतीच्या आधारे झेंडा चौक शांतीनगर नागपुर परीसरातुन आरोपी नामे **१. कुणाल उर्फ दाना इश्वर पुडके वय १९ वर्षे रा सोनेगाव राजा ता कामठी जि नागपुर ,२. आशिष उर्फ मेंढा विजय मेंढे वय २७ वर्षे,झंडा चौक,शांतीनगर नागपुर ३. गौरव उर्फ मन्नत रतन वर्मा वय १९ वर्षे झेंडाचौक प्रेमनगर नागपुर** व तीन अल्पवयीन बालकास ताब्यात घेवुन त्यांच्या ताब्यातुन **नगदी ७०,०००/— रू , गुन्हयात वापरलेल्या मोटारसायकल किंमती १,५५,०००/— रूपये तसेच ,४ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल किंमत १,००,०००/— रूपये असा एकुण ३,२५,०००/— रूपयेचा मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे.**

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,मा. श्री. संतोष गायकवाड उपविभागिय पोलीस अधिकारी,कन्हान विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन मौदा चे ठाणेदार वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री प्रमोद घोंगे ,पोलीस उपनिरीक्षक महेश बोथले, पोहवा संदीप कडु, गणेश मुदमाळी ,रूपेश माहदुले ,पोलीस नाईक दिपक दरोडे पोलीस स्टेशन मौदा यांनी पार पाडली. .



## अवैध तंबाखु गुटखा पानमसाला वाहतुक करणा—यावर  केळवद पोलीसांची कारवाई

**पो.स्टे. केळवद** :— १२/१०/२०२४ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने बातमी मिळाली की आरोपी नामे चंद्रशेखर नामदेवजी हिवरकर  वय ३५ वर्ष रा. वार्ड क्र १ तेलंगखेडी कज नागपुर हा सुगंधीत तंबाखु पानमसाला याची व्रिकी तसेच वाहतुक करतो मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी १२/१०/२०२४ चे १२/३० वा. ते १३/१० वा दर. सापाळा रचुन आरोपीला सावनेर  ते छिंदवाडा  रोडवर पकडले तेव्हा त्याच्या ताब्यात तीन चाकी बजाज ऑटो क्र एम एचा ३२ सी ८६४२  हया मध्ये सुगंधीत तंबाखु जनम ५३५ ५००ग्रॅम ,४० नग २५० रू एकुण वनज २० ग्रॅम असा १०,०००रू किंमतीचा मुददेमाल मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष पंचनामा करून **तीन चाकी बजाज ऑटो क्र एम एचा ३२**

**सी ८६४२ किंमत २,००,००० रूपये आणि सुगंधीत तंबाखु जनम ५३५ ५००ग्रॅम ,४० नग २५० रू एकुण वनज २० ग्रॅम असा १०,०००रू असा एकुण २,१०,०००/— रूपयाचा मुददेमाल** ताब्यात घेतला.सदर माहीती अन्न सुरक्षा अधिकारी , अन्न व औषध प्रशासन, म. राज्य, नागपूर, यांना देण्यात आली

श्रीमती. एस. व्ही. बाभरे, अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, म. राज्य, नागपूर, धंदा— नौकरी यांच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन केळवद येथे आरोपी नामे **चंद्रशेखर नामदेवजी हिवरकर वय ३५ वर्ष रा. वार्ड क्र १ तेलंगखेडी कज नागपुर** याचे विरूध्द **कलम** २२३,२७४,२७५, १२३ भारतीय न्याय संहीता—२०२३ सहकलम २६ (१), २६(२)(४) ,२७(३) (ई), ३०(२) (ए), अन्न सुरक्षा व मानक अधिनियम—२००६, सहकलम ३(१) (झेड झेड) (४),५९ असा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,मा. श्री. अनिल म्हस्के, उपविभागिय पोलीस अधिकारी,सावनेर विभाग तथा सहा. पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली केळवद पोलीस स्टेशन ठाणेदार सपोनि श्री अनिल राउत आणि केळवद पोलीस स्टाफ यांनी पार पाडली. .

## अवैध तंबाखु गुटखा पानमसाला विक्री करीता वाहतुक करणा—यावर खापा पोलीसांची कारवाई

**पो.स्टे. खापा** :— १२/१०/२०२४ रोजी खापा पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने बातमी मिळाली की इसम अवैधरित्या सुंगधी तंबाखु ,पानमसाला,गुटखा यांची वाहतुक करत आहेत. मिळालेल्या माहीतच्या आधारे पोलीसांनी दखल घेवुन मौजा टेंभुरडोह येथे आरोपी १) रमेश शेषराव चंदनकर वय ३८ वर्ष रा.टेंभुरडोह ता.सावनेर २)विजय बटटे रा.बडेगाव ता.सावनेर यांना गाठले तसेच त्यांना विचारपुस केली असाता त्याच्या ताब्यातुन **सुंगधी तंबाखु वाहतुक करण्यासाठी वापरलेली होंडा एम एच ४० बीबी ३८४७ किंमत ४०,००० /— रूपये, , पान मसाला (पान पराग ) ९६ ग्रॅम एकुण २८ किंमत ३५८४ /— रूपये , सुंगधीत तंबाखु**

**(रत्ना नं ३०० ) ५० ग्रॅम एकुण १० नग ६२० /— रूपये , सुगंधीत तंबाखु (जनम ५३५ ) ५०० ग्रॅम एकुण ८३ नग किंमत २०,७५० /— रूपये, सुगंधीत तंबाखु (बागबान १३८ ) ३० ग्रॅम एकुण १५ नग किंमत २१७५२ /— रूपये, , पानमसाला विमल ६० ग्रॅम एकुण ३ नग किंमत ३६० /— रूपये, सुगंधीत तंबाखु (व्हि १ ) ३० ग्रॅम एकुण ५ नग किंमत १५० /— रूपये, असा एकुण ६७६३९/— रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे**..सदर माहीती अन्न सुरक्षा अधिकारी , अन्न व औषध प्रशासन, म. राज्य, नागपूर, यांना देण्यात आली श्रीमती. एस. व्ही. बाभरे, अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, म. राज्य, नागपूर, धंदा— नौकरी यांच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन खापा येथे **१) रमेश शेषराव चंदनकर वय ३८ वर्ष रा.टेंभुरडोह ता.सावनेर २) विजय बटटे रा.बडेगाव ता.सावनेर यांच्या** विरूध्द कलम२२३,२७४,२७५, १२३ भारतीय न्याय संहीता—२०२३ सहकलम २६ (१), २६(२)(४) ,२७(३) (ई), ३०(२) (ए), अन्न सुरक्षा व मानक अधिनियम—२००६, सहकलम ३(१) (झेड झेड) (४),५९ असा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,मा. श्री. अनिल म्हस्के, उपविभागिय पोलीस अधिकारी,सावनेर विभाग तथा सहा. पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली खापा पोलीस स्टेशन ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी यांच्या सह खापा पोलीस स्टाफ यांनी पार पाडली. .

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**